दि.०१.०१.२००६ रोजी किंवा त्यानंतर सेवानिवृत्त झालेल्या/मृत पावलेल्या निवृत्तीवेतनधारक/कुटुंब निवृत्तीवेतनधारकांना मृत्यु-नि-सेवा उपदानाची कमाल मर्यादा रु.७.०० लाख करणे.

**महाराष्ट्र शासन**

**वित्त विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः सेनिवे-२०१५/प्र.क्र.०१/सेवा-४,**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,

वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

तारीख: ४ फेब्रुवारी, २०१५.

**वाचा**

१) **शासन निर्णय क्रमांकः सेनिवे-१००९/प्र.क्र.३१/सेवा-४, दिनांक ०५ मे, २००९.**

२) **शासन निर्णय क्रमांक: सेनिवे-१००९/प्र.क्र.६९/सेवा-४, दिनांक २१ ऑगस्ट, २००९.**

**शासन निर्णय**

दि.०१.०१.२००६ रोजी किंवा त्यानंतर सेवानिवृत्त झालेल्या/मृत पावलेल्या पात्र निवृत्तीवेतनधारक/कुटुंब निवृत्तीवेतनधारकांना मृत्यु-नि-सेवा उपदानाची कमाल मर्यादा रु.७.०० लाख करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. हा निर्णय मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांनी विशेष अनुमती याचिका क्र.३७००/२०१२ मुळे उद्भवलेल्या सिव्हील अपील क्र.९०८/१३ मध्ये दि.३०.०१.२०१३ रोजी दिलेल्या निर्णयानुसार घेण्यात येत आहे. त्या अनुषंगाने वरील दि.२१ ऑगस्ट,२००९ चा शासन निर्णय रद्द करण्यात येत आहे.

२. उपरोक्त निर्णयानुसार दि.०१.०१.२००६ रोजी किंवा त्यानंतर सेवानिवृत्त झालेल्या/मृत पावलेल्या पात्र निवृत्तीवेतनधारक/कुटुंब निवृत्तीवेतनधारकांना अनुज्ञेय असलेली रक्कम एकरकमी अदा करण्यात यावी.

३. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३०९ याच्या परंतुकान्वये तयार करण्यात आलेल्या महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मधील नियम १२९-ए (५) (बी) नुसार उपदानाच्या फरकाच्या रकमेवर व्याज अनुज्ञेय असणार नाही.

४. शासन असाही आदेश देत आहे की, ज्यांना निवृत्तिवेतन योजना लागू केलेली आहे अशा मान्यता व अनुदानप्राप्त शैक्षणिक संस्था, कृषितर विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्न असलेली अशासकीय महाविद्यालये व कृषि विद्यापीठे यांमधील पात्र निवृत्तिवेतनधारक/कुटुंब निवृत्तिवेतनधारक यांना वरील निर्णय, योग्य त्या फेरफारांसह, लागू राहील.

५. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक पाच) च्या कलम २४८ च्या परंतुकान्वये प्रदान केलेले अधिकार आणि त्यासंबंधातील इतर सर्व अधिकार यांचा वापर करुन शासन असाही आदेश देत आहे की, वरील निर्णय जिल्हा परिषदांचे पात्र निवृत्तिवेतनधारक/कुटुंब निवृत्तिवेतनधारक यांनाही लागू राहील.

६. या शासन निर्णयाची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०२०३१५०४५१८१०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Radhika Rastogi

Digitally signed by Radhika Rastogi
DN: c=IN, o=All India Service, ou=IAS, postalCode=110001, st=Maharashtra, cn=Radhika Rastogi
Date: 2015.02.04 17:13:50 +05'30'

**राधिका रस्तोगी**

सचिव (लेखा व कोषागारे)

**प्रत,**

१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई (१००० प्रती),

२) महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर(१००० प्रती),

३) महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई (५ प्रती),

४) महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर (५प्रती),